# समर जॉब फ़ेअर ला उत्स्फूर्त प्रतिसाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्द्यमाने आयोजित "समर जॉब फ़ेअर" ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

एस. एस. सी. पासून ते पदवी व पदव्युत्तर पर्यंतचे सुमारे १५०० (दीड हजार) विद्यार्थी या जॉब फ़ेअर साठी उपस्थित झाले होते. औरंगाबाद येथील वास्तू सर्विसेस, नेसेन्सी इन्फोटेक, विप्रो लि., ज्योतिबा टेक्नोलॉजिस, हर्मन फिनोकेम, आय.सी.आय.सी.आय बँक, कोटक महिंद्रा बँक, आय.एन.जी.(न्यू कोटक), इंड्रेस हाऊजर, धूत ट्रान्स्मिशन, रुबीकॉन, पर्किन्स, एन.आर.बी., बॅकस्टर इंडिया लिमिटेड इत्यादी विविध क्षेत्रातील कंपन्यांचे प्रतिनिधी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी उपस्थित होते.

एकूण १४ कंपन्यांमधून १५०० उपस्थितांपैकी ५९६ विद्यार्थ्यांची अंतिम मुलाखतींसाठी निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना कंपनीच्या कार्यालयात अंतिम मुलाखतीसाठी बोलावण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे बी.सी.यु.डी. संचालक डॉ. के.वि. काळे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर विभागीय रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे उपसंचालक श्री. सुनील सैंदाणे, सहाय्यक संचालक श्री. विजय रिसे हे उपस्थित होते.

सदर जॉब फ़ेअर यशस्वी होण्यासाठी विद्यापीठाचे प्लेसमेंट ऑफिसर श्री. गिरीश काळे, विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे श्री. सुरेश वराडे, श्री. देविदास मिसाळ, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे श्री. भुजंग रिठे, तसेच श्री. सुरेश शेळके यांनी परिश्रम घेतले.